ePaper

## आदित्य ठाकरे यांची देखील नार्को टेस्ट करायला पाहिजे'; दिशा प्रकरणात कदमांची मागणी

| वर्ष - 8 | अंक - 248 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

### आतील पानांत


- रहाणेची विनंती क्युरेटरने नाकारली!
- अनसोल्ड राहिलेल्या शार्दुलचा कहर
- सई पहिल्यांदाच थिरकणार लावणीवर!
- लोकसभेत इमिग्रेशन विधेयक मंजूर!


www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 28 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## वाघ्या कुत्र्याच्या समाधीवरून घमासान

# संभाजी राजे × संभाजी भिडे!

## वाघ्याची समाधी हटवणे शक्य आहे का? तमाम शिवप्रेमी वाघ्याच्या बाजूने !

| मुंबई / पुणे / सांगली | प्रतिनिधी | महाईन्यूज

**स्वराज्याची राजधानी रायगड येथे 'वाघ्या' या कुत्र्याची समाधी असून त्यावरून सध्या घामासान सुरू आहे. या वाघ्याने छत्रपती शिवरायांना साथ दिली होती, असे काही इतिहासकारांचे म्हणणे आहे. तर कोल्हापूरचे संभाजी राजे यांनी त्याचे अस्तित्वच नाकारले असून त्याची समाधी हटविण्यासाठी सरकारला मुदत दिली आहे. दरम्यान, सांगलीतील श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे प्रमुख संभाजीराव भिडे गुरुजी यांनी तसेच लाखो शिवप्रेमींनी ही वाघ्याची समाधी हटवण्यास विरोध दर्शवला आहे.**



छत्रपती शिवरायांच्याबरोबर वाघ्याचे अस्तित्व होते का, हा ज्याप्रमाणे इतिहासकारांसमोर प्रश्न आहे, त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणावर विरोध दिसत असल्यामुळे ही समाधी हटवणे शक्य आहे का? हा मुद्दा आता चर्चेला आला आहे. रायगडवरील वाघ्या कुत्र्याच्या समाधीवरुन सुरु असलेला वाद आता ऐन शिगेला पोहोचला आहे. किल्ले रायगडावरील वाघ्या कुत्र्याची समाधी हटवण्याची मागणी कोल्हापूरचे माजी खासदार संभाजीराजे यांनी केली आहे. तसे पत्र त्यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिले आहे.

### भिडे गुरुजींचा शब्द अंतिम !

या वादात आता शिवप्रतिष्ठानचे प्रमुख संभाजीराव भिडे गुरुजी यांनी उडी घेतली आहे. संभाजीराव भिडेंनी वाघ्या कुत्र्याची सत्य कथा सांगितली आहे. त्यांचा शब्द अंतिम मानणारे लाखो कार्यकर्ते आहेत, त्यांचाही समाधी हटवण्यासाठी विरोध आहे, हे लक्षात घ्यायला हवे. त्यांच्याप्रमाणेच आमदार गोपीचंद पडळकर यांच्यापासून सर्वच भाजपाचे आमदार विरोध करणार, हे आता हळूहळू स्पष्ट होत आहे.

### वाघ्या हे कपोलकल्पित पात्र!

किल्ले रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधी शेजारी असलेली वाघ्या कुत्र्याची समाधी काढून टाकावी, अशी मागणी संभाजीराजे यांनी केली आहे. समाधी हटवण्यासाठी त्यांनी सरकारला दि. ३१ मेपर्यंतची मुदत दिली आहे. वाघ्या कुत्रा नामक पात्राचा शिवकालीन इतिहासात कसलाही उल्लेख किंवा संदर्भ सापडत नाही. त्यामुळे अशा प्रकारे कपोलकल्पित कुत्र्याचा पुतळा किंवा समाधी उभारणे, ही छत्रपती शिवाजी महाराजांशी घोर प्रतारणा असल्याचे संभाजीराजे यांचे म्हणणे आहे.



### वाघ्याची समाधी हे अतिक्रमणच...

कोणतीही ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि महत्त्व नसलेली ही वाघ्या कुत्र्याची समाधी नामक संरचना हे दुर्गराज रायगडवरील अतिक्रमण असून राज्य शासनाच्या धोरणानुसार दि. ३१ मेअखेरीपर्यंत हे अतिक्रमण श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळावरून व दुर्गराज रायगड वरून कायमस्वरूपी हटविण्यात यावे, असे ते म्हणतात. भारतीय पुरातत्व विभागाच्या धोरणानुसार शंभर वर्षांहून अधिक पुरातन असलेली संरचना संरक्षित स्मारक म्हणून गणली जाते. त्यामुळे वाघ्या कुत्रा समाधी संरचनेस १०० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच विहित कालमर्यादेत ही संरचना हटविणे अत्यावश्यक असल्याचेही संभाजी राजे यांचे म्हणणे आहे.

### वाघ्याने शिवरायांच्या चितेत उडी घेतली

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे प्रमुख आणि शिवप्रेमी संभाजीराव भिडे गुरुजींनी रायगडवरील वाघ्या कुत्र्याच्या स्मारकाचे समर्थन केले आहे. संभाजीराजे बोलतात ते शंभर टक्के चूक आहे. वाघ्या कुत्र्याबाबत आपण इतिहास वाचला आहे आणि त्याच्या संदर्भातील कथा सत्य आहे. वाघ्या कुत्र्याने चितेत उडी घेतली, हे सत्य आहे, त्यामुळे स्मारक म्हणून ते केले आहे. माणसे एकनिष्ठ नसतात, तेवढी कुत्री असतात, निदान आताच्या युगात देशाशी एकनिष्ठ राहायचे आहे, याचे द्योतक म्हणून वाघ्या कुत्र्याचे स्मारक तिथेच पाहिजे. स्वार्थासाठी कशीही मते बदलणाऱ्या माणसांना माझे मत पटणार नाही. पण, त्यांना पटवण्याचा मी ध्यास घेतलेला नाही.

## वाहतूक शाखेने 59 ठिकाणी बदल केल्याने कोंडीमध्ये घट

# शहरामध्ये वाहतुकीच्या वेगामध्ये वाढ!

### गतवर्षीच्या तुलनेत वाहतूकीचा वेग 10.5 टक्क्यांनी वाढल्याची माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाहतूक शाखेने ५९ ठिकाणी बदल केल्याचे दृश्य परिणाम दिसू लागले असून शहरामध्ये रस्त्यांवरकील वाहतुकीच्या वेगामध्ये वाढ तर कोंडीमध्ये घट झाली आहे. वाहतूक कोंडीत आघाडीवर असलेल्या पुणे शहरात मागील सहा महिन्यांपासून म्हणजेच सप्टेंबर २०२४ पासून केलेल्या विविध उपाययोजनांमुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर गतवर्षीच्या तुलनेत वाहतूकीचा वेग १०.५ टक्क्यांनी वाढल्याची माहिती वाहतूक विभागाकडून देण्यात आली.**



वाहतूक विभागाने शहरातील ५९ ठिकाणी प्रमुख बदल केले. तर सिग्नल सिंक्रोनायझेशन, वाहतूक पोलिसांना प्रशिक्षण यामुळे हे शक्य झाल्याची माहिती अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली. वाहतूक शाखेचे उपायुक्त अमोल झेंडे, सहायक आयुक्त नंदिनी वग्यानी, पोलीस निरीक्षक सुनील गवळी या वेळी उपस्थित होते. शहरातील वाहतूक कोंडीची स्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अरूंद रस्ते, त्यात रस्त्यांवर झालेल्या अतिक्रमणांसह इतर कारणांमुळे अनेक भागात कोंडी होते.शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी वाहतूक पोलीस आणि महापालिका एकत्रित काम करत आहे. गेल्या काही महिन्यांपासून वाहतूक पोलिसांनी शहरातील नगर रस्ता, सोलापूर रस्त्यावर विविध उपाययोजना करून त्या यशस्वी करून दाखविल्या आहेत. सध्या या दोन्ही प्रमुख रस्त्यांवरील वाहतुकीचा वेग वाढला आहे, असे पाटील यांनी सांगितले. शहरातील प्रमुख रस्त्यांचा आढावा घेवून वाहतूक पोलिसांनी उपाययोजना केल्या, असे सांगून पाटील म्हणाले,'२६५ किलोमीटर अंतर असलेल्या एकूण ३३ प्रमुख रस्त्यांची निश्चित करून या रस्त्यांच्या सुधारणासाठी वाहतूक पोलिसांनी उपाययोजना केल्या आहेत. यामध्ये वाहतूक अभियांत्रिकी बदल, तंत्रशुद्ध पद्धतीने वाहन संख्येच्या आधारे उजवीकडे आणि डावीकडे वळण बंद किंवा सुरू करणे, चिंचोळ्या रस्त्यावरील (बॉटल नेक) कोंडी दूर करणे, वाहतुकीस अडथळा ठरणारे पीएमपीएमएलचे थांबे हलविणे, खासगी बसेस, रिक्षा स्थानके स्थलांतरीत करणे यासह इतर उपाययोजना केल्या. त्यामुळे या रस्त्यांवर वाहतुकीचा वेग वाढण्यास मदत झाली आहे.' एवढेच नाही तर रस्त्यांवर कोंडी होण्याची कारणे वाहतूक पोलिसांनी शोधली आहेत. यामध्ये काही वेळा अचानक अधिक संख्येने येणाऱ्या वाहनांमुळे कोंडी होते. तर, काही वेळा नागरिकांच्या चुका, वाहने रस्त्यावर बंद पडणे, रस्त्यावर वाहतूक पोलीस नसणे यामुळेही कोंडी होत असल्याचे समोर आले आहे.वाहतूक पोलिसांनी शहराचा तीन महिन्यांचा आढावा घेतला आहे. त्यात सर्वाधिक कोंडी वाहने रस्त्यावर बंद पडल्याने झाल्याचे दिसून आले आहे. तीन महिन्यात तब्बल ११४ वेळा वाहने बंद पडल्याने कोंडी झाली.

#### वाहने बंद पडल्याने सर्वाधिक कोंडी

तर, बेशिस्तपणे वाहन लावणे, वाहन चालविणे, खड्डे, अपघात, रस्त्यांची कामे, वेगवेगळे कार्यक्रम तसेच सिग्नल बंद पडण्याच्या घटनांमुळे देखील कोंडी होत असल्याचे समोर आले आहे. वाहतूक शाखेने ५९ ठिकाणी बदल केल्याचे दृश्य परिणाम दिसू लागले असून शहरामध्ये रस्त्यांवरकील वाहतुकीच्या वेगामध्ये वाढ तर कोंडीमध्ये घट झाली आहे.

---

## इलेक्ट्रॉनिक उपरणे वापरल्यास महागात पडणार

### खासगी प्रवासी वाहनांसाठी आदर्श कार्यपद्धती तयार करण्यात येईल

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्रवासी वाहतूक करताना मोबाईल पाहणे किंवा इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरणे (हेडफोन, इअरबड्स) चालकांना आता महागात पडणार आहे. त्यानुसार सरकारी-निमसरकारी तसेच खासगी प्रवासी वाहनांसाठी स्वतंत्र नियमावली अंमलात आणण्यासाठी तज्ज्ञांच्या मदतीने प्रादेशिक परिवहन विभागाकडून (आरटीओ) आदर्श कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्यात येणार आहे.**



प्रवासी वाहतूक करणारा बसचालक वाहन चालवताना क्रिकेट सामना बघत असल्याचे छायाचित्र समोर आल्यानंतर प्रशासनाकडून संबंधित चालकावर कारवाई करण्यात आली. मात्र, खासगी वाहनचालकांकडून असे प्रकार घडल्याने मृत्यू, अपघाताची शक्यता वाढते. गेल्या काही वर्षात मोबाईलचा वापर सहजतेने होत असून रिक्षा, कारचालक किंवा इतर प्रवासी वाहनचालकांकडून असे वर्तन होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी सरकारी, निमसरकारी तसेच प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी वाहनचालकांच्या गैरवर्तनाबाबत कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, तज्ज्ञांची समिती स्थापन करून कायदेशीर नियमावली तयार करण्याचे आदेश दिले.प्रादेशिक परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्या अध्यक्षतेखाली नवीन कायद्यांच्या अनुषंगाने नियमावली तयार करण्यात येणार आहे. वाहन चालविताना मोबाईलचा किंवा आधुनिक उपकरणांचा सहजतेने होणारा वापर यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणत्या उपायोजनांची आवश्यकता आहे, याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करतील.प्रवासी वाहतूक करणारा बसचालक वाहन चालवताना क्रिकेट सामना बघत असल्याचे छायाचित्र समोर आल्यानंतर प्रशासनाकडून संबंधित चालकावर कारवाई करण्यात आली. मात्र, खासगी वाहनचालकांकडून असे प्रकार घडल्याने मृत्यू, अपघाताची शक्यता वाढते.

#### कारवाई करण्याचे आरटीओचे आदेश

गेल्या काही वर्षात मोबाईलचा वापर सहजतेने होत असून रिक्षा, कारचालक किंवा इतर प्रवासी वाहनचालकांकडून असे वर्तन होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी सरकारी, निमसरकारी तसेच प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी वाहनचालकांच्या गैरवर्तनाबाबत कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

## पीसीएमसीमध्ये हवा प्रदूषणासाठी कारणीभूत

# मावळातील 2 हजार 607 महिला ‘दोडक्या’!

## मावळ तालुक्यातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमधून महिला अपात्र

| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारची लाडकी बहीण योजना प्रचंड लोकप्रिय ठरली. या योजनेमुळे महायुतीने विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात घवघवीत यश मिळवले. निवडणूक झाल्यानंतर योजनेच्या निकषावरून शासनाने पडताळणी सुरू केली. निवडणुकीत सरसकट मंजूर झालेले अर्ज निवडणुकीनंतर आता पडताळणीच्या चक्रात अडकले आहेत.त्यामुळे अनेक लाडक्या बहिणी “दोडक्या” ठरताना दिसून येत आहेत.**



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत मावळ तालुक्यातील महिलांना आतापर्यंत सुमारे १४ कोटी रुपये जमा झाले होते. आता शासन आदेशानुसार चौकशीअंती २ हजार ६०७ महिला या योजनेतून ‘दोडक्या’ अर्थात अपात्र ठरल्या आहेत.

मावळ तालुक्यात या योजनेअंतर्गत ९६ हजार ९६८ अर्ज पात्र ठरले. त्यापैकी ९४ हजार ३६१ अर्जांना मंजुरी मिळाली. गेल्या वर्षी पहिल्या फेरीत ४७ हजार महिलांच्या बँक खात्यामध्ये प्रत्येकी तीन हजार रुपये जमा झाले होते. तोपर्यंत अनेक महिलांनी हा अर्ज भरला नव्हता. पण, जसे इतरांच्या खात्यावर पैसे जमा झाले तसे उर्वरित महिलांनीही हा अर्ज भरण्यासाठी तसेच बँकांत खाते उघडण्यासाठी गर्दी केली. त्यानंतर अर्ज भरणाऱ्यांचा आकडा तब्बल ९६ हजार ९६८ वर गेला. त्यातील ९४ हजार ३६१ अर्जांना मंजुरी मिळाली.

### पैसे परत घेणार का?

योजनेतून अपात्र ठरल्यानंतर महिलांना आता आपले मिळालेले पैसे शासन परत घेणार का अशी धास्ती आहे. पैसे परत घेण्याची भीती लाडकी बहीण योजनेतील लाभार्थींची पडताळणी करण्याचे शासनाने जाहीर केले. त्यावेळी अनेक गरजू नसलेल्या महिलांच्या खात्यावर जमा जालेले पैसे परत द्यावे लागतील काय, या बाबत चर्चा सुरू होती. मात्र, दिलेली रक्कम परत घेणार नसल्याचे शासनाने जाहीर केल्यानंतर ही धास्ती कमी झाली.

“ शासनाचे योजनेबाबत पडताळणीचे निकष ठरल्यानंतर या भागामध्ये मंजूर लाभार्थ्यांची निकष पडताळणी केली जात आहे.जास्त उत्पन्न असणे, कुटुंबीयांच्या नावावर चारचाकी वाहन, आयकर भरणे, रेशन कार्ड नसणे अशा विविध कारणांमुळे चौकशीअंती २६०७ महिला लाडकी बहीण योजनेसाठी अपात्र ठरल्या आहेत.

**–विशाल कोतागडे,** प्रकल्प अधिकारी, मावळ पुणे

---

## औद्योगिकनगरीत आता ‘उद्योग सुविधा कक्ष’!

## व्यवसाय सुलभतेसाठी एकात्मिक प्रणाली; गुंतवणूकदारांना जलद व पारदर्शक सेवा उपलब्ध

| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने औद्योगिक आणि आर्थिक गुंतवणुकीला चालना देण्यासाठी ‘उद्योग सुविधा कक्ष’ कार्यान्वित केला आहे. राज्य सरकारच्या ‘१०० दिवसांचा ‘कृती आराखडा’ उपक्रमाअंतर्गत ‘गुंतवणूक प्रसार कृती कार्यक्रम’ राबवण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून ‘व्यवसाय सुलभता’ संकल्पनेवर आधारित ‘उद्योग सुविधा कक्ष’ कार्यान्वित करण्यात आला आहे.**





उद्योग सुविधा कक्षाचा उद्देश महानगरपालिका व स्थानिक उद्योगधंद्यांमध्ये संवाद प्रस्थापित करणे, उद्योगांना भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करणे आणि शहराच्या विकासात त्यांचा सक्रिय सहभाग वाढवणे हा आहे.

उद्योग सुविधा पक्षाच्या माध्यमातून औद्योगिक गुंतवणुकीस अनुकूल वातावरण निर्माण करणे. व्यापारी, उद्योजक व कामगार संघटनांशी संवाद साधून स्थानिक पातळीवरील अडचणी समजून घेणे व त्याचे निराकरण करणे.गुंतवणूकदार उद्योजकांना प्रशासनाशी समन्वय साधून आवश्यक कायदेशीर व प्रशासकीय सहकार्य पुरवणे अशी कामे करण्यात येणार आहे.

### कक्षाच्या माध्यमातून काय होणार

महानगरपालिकेच्या वतीने ‘उद्योग-सारथी’ पोर्टल सुरू करण्यात आले आहे. नोंदनी करिता पोर्टल लिंक - https://publicptaxpcmc.in/ifc/index.php किंवा महानगरपालिकेच्या वेबसाईट पेज वर IFC बोक्स वर क्लीक करावे.व्यापारी, उद्योग संघटनांसाठी “तक्रार निवारण” / ‘Grievance Redressal’ पोर्टल कार्यान्वित.या पोर्टलद्वारे उद्योग-धंदा परवाना, तसेच इतर स्थानिक सुविधां व सेवां बाबतच्या तक्रार नोंदविता येईल. उद्योगांकडून सूचना मागवण्यासाठी पोर्टलवर ‘Suggestion Box’ उपलब्ध.

“ ‘पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शहरातील औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. ‘उद्योग सुविधा कक्ष’ हा स्थानिक उद्योग व प्रशासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा ठरेल. या उपक्रमामुळे गुंतवणूकदारांना पारदर्शक व वेगवान सेवा मिळेल आणि व्यवसाय सुलभतेला चालना मिळेल. महानगरपालिकेच्या विविध विभागांशी समन्वय साधून औद्योगिक अडचणी सोडवण्यासाठी हा कक्ष प्रभावी भूमिका बजावेल’.


**–शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

“ “उद्योग सुविधा कक्ष’ आणि ‘उद्योग-सारथी’ पोर्टलच्या माध्यमातून डिजिटल यंत्रणेद्वारे उद्योगांसाठी सुलभ आणि पारदर्शक सेवा पुरवली जात आहे. या प्लॅटफॉर्मद्वारे उद्योग-धंद्यांना देण्यात येणारे आवश्यक त्या सुविधा व परवानग्या ऑनलाईन उपलब्ध होतील, तसेच त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी थेट संवादाची संधी देखील उपलब्ध होईल. अधिक माहितीसाठी उद्योग प्रतीनिधीनी महानगरपालिकेच्या चौथ्या मजल्यावरील “उद्योग सुविधा कक्ष’ किंवा udyog.sarthi@pcmcindia.gov.in या email id वर संपर्क साधावा” .

**–निळकंठ पोमण,**

मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, पिंपरी चिंचवड

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रपंचातले सुखदुःख हे केवळ जाणिवेत आहे

प्रापंचिकाच्या मनात नेहमी एक शंका येते की, खोटे करूनसुद्धा जर सुखी होता येते तर तसे करायला काय हरकत आहे ? सन्मार्गाने गेला तरी माणूस दुःखी का होतो, अशीही शंका आपल्याला येते. मी देवाला भिऊन वागलो, का, तर प्रपंच सुखाचा व्हावा म्हणून. देवाची एवढी खटपट करूनही जर सुखी होता येत नाही तर काय उपयोग ? किती विचित्र आहे पाहा, खेळातले घर बांधायला आपण गवंडी बोलावण्यासारखा हा प्रकार आहे ! प्रपंचात दक्षता ठेवणे जरूर आहे; ते जर आपण केले नाही तर देवाने काय करावे ? भगवंताचा 'साधन' म्हणून आपण उपयोग करतो, आणि शेवटी साधनालाच दोष देतो, साध्य बाजूलाच राहते. भगवंत विषय देईल, पण त्याबरोबर त्याचे दुःखही देईल. एकजण मारुतिरायाला सांगून चोरी करीत असे. तो एकदा पकडला गेला आणि त्याला शिक्षाही झाली; तेव्हा तीही मारुतीच्या संमतीनेच झाली असे नाही का?

'मी कोण' हे जोवर आपण ओळखत नाही तोवर, वैभवाच्या शिखरावर जरी गेलो तरी आपल्याला समाधान मिळणार नाही. ज्याच्यापासून प्रपंच झाला, त्याला ओळखता आले पाहिजे. देहच सत्य नाही तर त्यावर उभारलेली इमारत कुठून सत्य असणार? ठिगळे लावून आपण प्रपंच करतो; मग त्यात कमतरता आल्याशिवाय नाही राहात ! कोळसा उगाळून पांढरा रंग मिळेल हे म्हणणे जसे वेडेपणाचे आहे, तसे प्रपंचात सुख मिळवीन हे म्हणणे आहे. सुखदुःख हे जाणिवेत आहे. आपल्याला मिळायचे तेवढेच मिळते, पण आपले हवेनकोपण, म्हणजे आपली वासना गेली की सुखदुःख राहात नाही. वासना मारायला, भगवंताचे अधिष्ठान हाच एक उपाय आहे. वासना ही लाडावलेल्या श्वानाप्रमाणे आहे, त्याला नुसते हड्हड् करून ते बाजूला जात नाही. पण तेही बरोबरच आहे, कारण आपणच त्याला लाडावून ठेवले आहे, म्हणून भगवंताच्या पूजेच्या वेळीसुद्धा ते देवघरात येते. बरे, चांगली वासना तेवढीच आत येऊ द्यावी असे म्हणावे, तर तिच्याबरोबर वाईट वासनाही हळूच आत येते. शिवाय, वाईट वासनेमध्ये चांगल्या वासनेला मारण्याचे बळ आहे, कारण आपण स्वतः वाईट वासनेच्या बाजूचेच आहोत ! वासना ही कोणत्याही उपायांनी तृप्त होण्यासारखी नसून, आपण जर भगवंताजवळ 'वास' ठेवला तरच ती नष्ट होते. 'मी कर्ता नसून परमात्मा कर्ता आहे' अशी भावना झाल्याशिवाय मन भगवंताला अर्पण होणार नाही; ते अर्पण झाल्याशिवाय फळाची अपेक्षा सुटणार नाही; आणि फळाची अपेक्षा सुटल्याशिवाय जीवाला शांती मिळणार नाही.

।। श्री राम जय राम जय जय राम ।।

**बोधवचनः- प्रपंचात सुखी होणे म्हणजे भगवंताचे होणे होय.**



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# एकनाथजींचे चौकार..षटकार, शब्दाचा बसला मार, झाले गपगार!

**शिवसेना नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधिमंडळात जे चौकार आणि षटकार ठोकले, त्यामुळे त्यांनी उद्धव आणि आदित्य ठाकरे यांना अक्षरशः गपगार करून टाकले. त्यांनी आरोपरूपी बाऊन्सर्स टाकले होते खरे, पण चौकार षटकार लगावत एकनाथ शिंदे यांनी त्यांची पिसे काढली.**



### वार-पलटवार कसले? नुसते वारच !

उद्धव आणि आदित्य यांचे एकनाथ शिंदे यांना उद्देशून जे टोमणे होते, किंवा कॉमेडियन कामरा याने एकनाथ शिंदे यांची उडवलेली खिल्ली होती, त्याला एकनाथ शिंदेंनी जबरदस्त तडाखा दिला असून पत्रकार त्याला वार-पलटवार म्हणत असले, तरी ते शिंदेंकडून एकतर्फी वारच होते !

### मशाल-खुशाल, डांबर-सांबार !

एकनाथ शिंदे यांनी सभागृहात आपला नवीन चेहरा दाखवला. आपल्याला शिंदेंचा शांत स्वभाव आठवतो, पण आक्रमक एकनाथ शिंदे पाहायला मिळाले. ठाकरे घराण्याच्या कोणत्याही टीकेला आपण घाबरत नाही, असे दाखवून देण्यासाठी ते अक्षरशः तुटून पडले. एकनाथ शिंदे यांनी शब्दांमधली लय म्हणजे रिदम साधला आणि शब्दांची उधळण केली. त्यामुळे ऐकणारे सुद्धा सुखावले ! उद्धव ठाकरे यांना उद्देशून बोलताना त्यांनी टोमणा लगावला, की कार्यकर्त्यांनी पेटवा मशाल, आम्ही झोपतो खुशाल! अशी यांची अवस्था आहे.

### डस्टबिन.. मिस्टर बिन..

सध्याच्या ठाकरे परिवाराने कार्यकर्त्यांना कचरा समजला आहे. त्यामुळेच त्यांना आम्ही हाय व्होल्टेज शॉक दिला, असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. कार्यकर्त्यांना कचरा समजून हे 'डस्टबिन' ची जागा दाखवतात, पण, हे स्वतः मिस्टर बिन आहेत, हे विसरून कसे चालेल ? शिंदे यांच्या या वक्तव्यावर सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

### आरशात वारसा शोधता का?

मुंबईच्या रस्त्यांवर हे नेहमी प्रश्न विचारतात, पण एवढी वर्षे डांबराचं सांबर कोणी खाल्ले, हे स्पष्ट करावे, असेही शिंदे म्हणाले. फक्त आरशात बघून आणि सांगून वारसा सांगता येत नाही, असे म्हणत शिंदेंनी ठाकरे पिता-पुत्रांना टोले लगावले. शिंदेंची चौफेर टोलेबाजी सुरू असताना आणि षटकारांची बरसात होत असताना उबाठा गट हतबल होऊन बसल्याचे चित्र दिसले!

### पोपटाचा जीव पिंजऱ्यात..

सध्या काँक्रिटचे रस्ते करणे सुरु आहे. त्यामुळे लोकांना थोडा त्रास होतोय, परंतु, त्यानंतर पुढील २५ वर्ष मुंबईत खड्डे दिसणार नाहीत. डांबरात हात काळे करण्याची संधी आता तुम्हाला मिळणार नाही. पोपटाचा जीव पिंजऱ्यात असतो, यांचा जीव मुंबईतील रस्ते आहेत. मागच्या अनेक वर्षात 'डांबराचे सांबर कुणी खाल्ले' हे आता समोर यायला हवं, असा शिंदेंचा सूर होता.

### आदित्य यांच्यावर शाब्दिक भडीमार

काही मिस्टर बिन यांनी डस्टबिनचा उल्लेख केला. सर्वसामान्य शिवसैनिकांना कचरा समजण्यामुळे तुमचा 'डस्टबिन' व्हायची वेळ आली आहे. आम्हाला कचरा समजलात, त्यामुळे याच कचऱ्याने तुम्हाला हायव्होल्टेज शॉक दिला, असा टोलाही एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंना लगावला.

### 'रिझन देणाऱ्यांचा सिझन' संपला..

एका मुद्द्यावर बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, विरोधकांचा अंतिम आठवडा 'प्रस्ताव उथळ' होता. अनेक विषय पुन्हा पुन्हा आलेले आहेत. 'महायुती' ची दुसरी इनिंग सुरु झाली आहे. 'नो रिझन, ऑन द स्पॉट डिसिजन' देणारे आमचे सरकार आहे. 'रिझन' देणाऱ्यांचा 'सिझन' जनतेने संपवून टाकला आहे. पाच वर्षांची टेस्ट मॅच आमची सुरु झाली आहे. पण काम 'टी-20' सारखे असणार आहे.

### आरशात पाहून वारसा नको..

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस औरंगजेबासारखे वाटले, त्यांना सांगायला हवे, की सगळीच वेळ सारखी नसते. मशाल पेटवून खुशाल झोपा काढणाऱ्यांना आता शहाणपण आले असेल, गद्दार, गद्दार म्हणून टीका करत बसलात. आरशात पाहून वारसा सांगता येत नाही, हे लक्षात ठेवा, असा टोला एकनाथ शिंदे यांनी उबाठा गटाला लगावला.

### तेव्हा कुठे होते संविधान ?

उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना एकनाथ शिंदे म्हणाले की, खोट्या केसेस उभ्या करून आमदार प्रसाद लाड आणि देवेंद्र फडणवीस यांना अटक करण्याचा प्रयत्न करताना कुठे होते संविधान ? नारायण राणे यांना अटक करताना संविधान आठवले नाही ? राणा दाम्पत्याला त्रास देताना संविधान आठवले नाही ? सचिन वाझे काय लादेन आहे का, असं म्हणताना संविधान आठवले नाही? कंगणा राणावत यांच्या घरावर बुलडोझर चालवताना संविधान आठवले नाही ? कार्यकर्त्यांनी पेटवा मशाल, आम्ही बंगल्यात झोपतो खुशाल अशी यांची अवस्था आहे. या शिल्लक सेनेने आपलीच काळजी करावी, असा टोमणा शिंदे यांनी मारून बरेच काही सूचित केले आहे.

### एकनाथ शिंदे नक्कीच रमले..

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री पद मिळाले म्हणून काहीसे नाराज असणारे एकनाथ शिंदे आता या सरकारमध्ये नक्कीच रमले आहेत. उबाठा गटावर खरपूस टीका करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली असावी आणि ती ते चोखपणे पार पडत असावेत, हे नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कोरटकर पोपटासारखा बोलायला लागला!

## शिवद्रोही कोरटकरची मध्यरात्री, पहाटे पोलिसांकडून कसून चौकशी

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी राजे यांच्याबाबत अवमानकारक वक्तव्ये करणारा शिवद्रोही प्रशांत कोरटकर पोलिसांच्या तावडीत येताच, त्याला कोठडीत '' बाजीराव ' दर्शन झाल्यावर तो पटापट कबुली द्यायला लागला असून इंद्रजित सावंत याना आपणच धमकीचा कॉल मोबाइल डेटा नष्ट केल्याचेही त्याने मान्य केले आहे.**



छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचा अवमान करून इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना फोनवरून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी प्रशांत मुरलीधर कोरटकर (वय ५०, रा. नागपूर) याच्या आवाजाचे नमुने फॉरेन्सिक लॅबच्या अधिकाऱ्यांनी बुधवारी (दि. २६) घेतले. आवाजाच्या नमुन्यांचा अहवाल आठ दिवसांत मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, मंगळवारी रात्रीपासून बुधवारी सकाळपर्यंत पोलिसांनी कोरटकर याच्याकडे तब्बल पाच तास कसून चौकशी केली. बुधवारी दुपारी १ च्या सुमारास फॉरेन्सिक लॅबचे दोन अधिकारी राजारामपुरी पोलीस ठाण्यात आले. त्यांनी पाच तास कोरटकर याच्या आवाजाचे नमुने घेतले. सावंत यांना फोन करून दिलेल्या धमकीची स्क्रिप्ट त्याच्याकडून पाचवेळा वाचून घेतली. यावेळी कोरटकर याने आपणच सावंत यांना फोन केल्याची कबुली दिली. प्रशांत कोरटकर याला २८ मार्च २०२५ अखेर पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार त्याला पोलीस कोठडीत ठेवले आहे. उशिरा रात्री त्याने छातीत दुखत असल्याची तक्रार केल्यावर त्याचवेळी त्याला इस्पितळात दाखल करून त्याची तपासणी करण्यात आली आहे. दरम्यान कोरटकर याला पोलिसांनी अधिक तपास करण्यासाठी इतरत्र हलवले असून जनतेच्या रोषाला तो बळी पडू नये याची काळजी घेतली जात आहे. मात्र, कोरटकर याला ठेवण्यात आलेल्या पोलीस कोठडीबाहेर असणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे तीन दिवसांचे संपूर्ण फुटेज मिळावे, अशी मागणी तक्रारदार इंद्रजित सावंत, ॲड. योगेश सावंत, ॲड. हेमा काटकर, ॲड. पल्लवी थोरात यांनी केली आहे. जुना राजवाडा पोलीस ठाण्याचे निरीक्षक झाडे यांना त्यासंदर्भात निवेदन देण्यात आले आहे. कोल्हापूर शहर पोलिसांनी अटक केल्यानंतर पोलीस कोठडी मिळालेल्या संशयित आरोपींना राजारामपुरी पोलीस ठाण्यात ठेवण्यात येते. त्यासाठी या ठिकाणी महिला आणि पुरुष लॉकअप आहेत. सध्या पुरुष लॉकअपमध्ये चार आरोपी आहेत; तर महिला लॉकअप रिकामे आहे. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव कोरटकर याला महिला लॉकअपमध्ये ठेवले आहे. मंगळवारी रात्री त्याला इतर आरोपींसारखे सरकारी भत्त्याचे जेवण देण्यात आले. यात दोन चपात्या आणि भाजी याचा समावेश होता. बुधवारी महिला लॉकअपमध्ये कोरटकर एका कोपऱ्यात बसला होता.छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचा अवमान करून इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना फोनवरून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी प्रशांत मुरलीधर कोरटकर (वय ५०, रा. नागपूर) याच्या आवाजाचे नमुने फॉरेन्सिक लॅबच्या अधिकाऱ्यांनी बुधवारी (दि. २६) घेतले. आवाजाच्या नमुन्यांचा अहवाल आठ दिवसांत मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, मंगळवारी रात्रीपासून बुधवारी सकाळपर्यंत पोलिसांनी कोरटकर याच्याकडे तब्बल पाच तास कसून चौकशी केली.-

### आवाज पडताळणी होणार

इंद्रजित सावंत यांच्या आवाजाचे नमुने घेतले आहेत. त्यानंतर संशयित आरोपी कोरटकर याच्या आवाजाचे नमुने घेण्यात आले. इतर चार व्यक्तींच्या आवाजाचे सॅम्पल म्हणून नमुने घेतले आहेत. कसबा बावडा येथील फॉरेन्सिक लॅबमध्ये त्यांच्या आवाजाची पडताळणी केली जाणार आहे. मूळ संभाषण, तसेच घेतलेल्या नमुन्यातील आवाजाचा चढ-उतार, बोलण्याची पद्धत, स्वर, व्यंजनाचा उच्चार करण्याची पद्धत यांचे शास्त्रीय विश्लेषण करण्यात येणार आहे. त्यानंतर तंतोतंत जुळणारा आवाज कोणाचा आहे? त्याचा निष्कर्ष काढण्यात येईल.बुधवारी दुपारी १ च्या सुमारास फॉरेन्सिक लॅबचे दोन अधिकारी राजारामपुरी पोलीस ठाण्यात आले.

---

# कुस्तीत अहिल्यानगरला पहिले सुवर्णपदक

## महाराष्ट्र केसरी कुस्तीत अहिल्यानगरचा सचिन मुरकुटे विजयी

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**६६ वी महाराष्ट्र केसरी व राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेमध्ये पहिले सुवर्णपदक अहिल्यानगर जिल्ह्याने पटकावले. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने कर्जत येथे महाराष्ट्र केसरी व राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा होत आहे. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी ५७ किलो वजनी गटामध्ये गादी विभागात अहिल्यानगर जिल्ह्याने पहिले सुवर्णपदक पटकावले. कर्जत तालुक्यातील कोरेगाव येथील सचिन मुरकुटे याने मुंबई शहरचा सचिन चौगुले यास एक चाकी डाव टाकत चितपट केले.**



आणि पहिले सुवर्णपदक पटकावले. यावेळी उपस्थित हजारो प्रेक्षकांनी जल्लोष केला. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आमदार रोहित पवार मित्रपरिवार व अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ यांच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी गादी आणि माती विभागातील तसेच महाराष्ट्र केसरी खुल्या गटातील कुस्त्यांना प्रारंभ झाला. ५७ किलो वजनी गटामध्ये अंतिम फेरीमध्ये अहिल्यानगरचा सचिन मुरकुटे यांनी मुंबईचा सचिन चौगुले यांचा पराभव केला. उपांत्य फेरी हर्षवर्धन भुजबळकर विजयी झाला त्याने प्रितेश भगत कल्याण याचा पराभव केला. तर दुसरा उपांत्य सामना छत्रपती संभाजी नगर येथील करण बागडे विरुद्ध सातारचा विशाल सुळ यांच्यामध्ये झाला. यामध्ये विशाल सुळ विजयी झाला असून अंतिम लढत विशाल सुळ सातारा व हर्षवर्धन भुजबळकर मुंबई उपनगर हे अंतिम फेरीमध्ये पोहोचले आहेत.आकाश दुबे पुणे शहर याने सांगलीचा योगेश मोहिते याचा उपांत्य फेरीमध्ये पराभव केला. आकाश दुबे हा अंतिम फेरीमध्ये पोहोचला आहे. दुसरी उपांत्य लढत कोल्हापूरचा सचिन बाबर विरुद्ध पुणे जिल्ह्याचा केतन खारे यांच्यामध्ये होऊन यामध्ये पुणे जिल्ह्याचा केतन खारे विजय झाला आहे.

केतन खारे हा देखील अंतिम फेरीमध्ये पोहोचला आहे. सांगलीचा स्वप्निल पवार विरुद्ध यश बुदखुडे पुणे यामध्ये यश बुदगुडे विजयी विशाल सुरवसे सोलापूर जिल्हा विरुद्ध अजिंक्य उंद्रे मानकर कोल्हापूर यामध्ये अजित कुंद्रे मानकर विजयी. यश बुदगुडे पुणे व अजित कुंद्रे मानकर अंतिम फेरीत पोहोचले आहेत. पहिले सुवर्णपदक पटकावले. यावेळी उपस्थित हजारो प्रेक्षकांनी जल्लोष केला अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ यांच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी गादी आणि माती विभागातील तसेच महाराष्ट्र केसरी खुल्या गटातील कुस्त्यांना प्रारंभ झाला.

### 74 किलो गादी विभाग

मुंबईचा सचिन चौगुले यांचा पराभव केला.उपांत्य फेरी हर्षवर्धन भुजबळकर विजयी झाला त्याने प्रितेश भगत कल्याण याचा पराभव केला.बागडे विरुद्ध सातारचा विशाल सुळ यांच्यामध्ये झाला. यामध्ये विशाल सुळ विजयी झाला असून अंतिम लढत विशाल सुळ सातारा व हर्षवर्धन भुजबळकर मुंबई उपनगर हे अंतिम फेरीमध्ये पोहोचले आहेत.

# लोकसभेत इमिग्रेशन विधेयक मंजूर!

## गृहमंत्री अमित शहा यांचा घुसखोरांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा



**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**लोकसभेत आज (बुधवार) इमिग्रेशन अँड फॉरेनर्स बिल, २०२५ मंजूर करण्यात आले आहे. यानंतर लोकसभेत झालेल्या चर्चेत भाग घेताना देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी महत्त्वाचे विधान केले आहे. शाह म्हणाले की, पर्यटक म्हणून किंवा शिक्षण, आरोग्य सेवा आणि व्यवसायासाठी भारतात येऊ इच्छिणाऱ्यांचे स्वागत करण्यास सरकार तयार आहे. पण जे धोका ठरू शकतात अशा लोकांविरोधात कठोर कारवाई केली जाईल यावर त्यांनी भर दिला.**

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार फक्त अशाच लोकांना रोखेल ज्यांचा भारताला भेट देण्याचा हेतू दूषित आहे. याबरोबरच त्यांनी देश हा धर्मशाळा नाही असेही वक्तव्य केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी यावेळी केले. "राष्ट्रीय सुरक्षेला धोका ठरतील अशांना देशात प्रवेश दिला जाणार नाही. देश म्हणजे 'धर्मशाळा' नाही. जर कोणी देशाच्या विकासात योगदान देण्यासाठी देशात येत असेल तर त्यांचे नेहमीच स्वागत आहे," असेही शाह यावेळी म्हणाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की प्रस्तावित कायदा हा देशाच्या सुरक्षेला बळ देईल आणि यामुळे अर्थव्यवस्था आणि उद्योगांना बळ मिळेल. याबरोबरच आरोग्य आणि शिक्षण क्षेत्राला देखील प्रोत्साहन मिळेल. तसेच इमिग्रेशन विधेयकामुळे भारत देशात येणाऱ्या प्रत्येक विदेशी व्यक्तीची ताजी माहिती उपलब्ध होण्यास मदत होईल.म्यानमार आणि बांगलादेशातून आलेल्या रोहिंग्या आणि बांगलादेशी लोकांच्या भारतात बेकायदेशीर घुसखोरीच्या मुद्द्यावर देखील अमित शहा यांनी भाष्य केले. वैयक्तिक फायद्यासाठी भारतात आश्रय घेणाऱ्या अशा लोकांचे प्रमाण वाढले आहे, ज्यामुळे देश असुरक्षित झाला आहे असेही शहा म्हणाले. जर भारतात अशांतता निर्माण केली तर घुसखोरांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला. या विधेयकामुळे देशाची सुरक्षा बळकट होईल आणि यामुळे २०४७ पर्यंत भारत जगातील सर्वात विकसीत देश बनेल असेही गृहमंत्री म्हणाले. "मी देशाला खात्री देऊ इच्छितो की आपल्या देशात येणाऱ्या प्रत्येक परदेशी व्यक्तीची अप-टू-डेट माहिती आपल्याकडे असेल," असेही ते म्हणाले.भारताला पर्यटक म्हणून शिक्षणासाठी, आरोग्य सुविधांसाठी, आर अँड डी, व्यवसाय आणि अशाच काही कारणांसाठी भेट देऊ इच्छिणाऱ्यांचे मी स्वागत करतो. पण जे देशासाठी धोका ठरतील आम्ही त्यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवू आणि त्यांच्या विरोधात कठोर कारवाई करू," असे शाह म्हणाले.अमित शहा यांनी पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस सरकारवर टीका केली. बेकायदेशीर घुसखोरांवर कारवाई न केल्याची टीका त्यांनी पश्चिम बंगाल सरकारवर यावेळी केली. भारत-बांगलादेश सीमेवरील ४५० किमी लांबीचे कुंपण घालण्याचे काम प्रलंबित आहे कारण पश्चिम बंगाल सरकारने त्यासाठी जमीन दिली नाही, असेही शाह म्हणाले. "जेव्हा जेव्हा कुंपणाचे काम पूर्ण होते तेव्हा सत्ताधारी पक्षाचे कार्यकर्ते गोंधळ करू लागतात आणि धार्मिक घोषणाबाजी केली फक्त त्याच भागातून बेकायदेशीर स्थलांतर होत आहे. राज्य सरकार घुसखोरांना आधार कार्ड्स मिळतील याची काळजी घेत आहे आणि ते देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये पसरत आहेत," असा आरोपही केंद्रीय गृहमंत्र्यांनी केला. "सर्वाधिक बेकायदेशीर आधार कार्ड दक्षिण २४ परगणा जिल्ह्यात आढळले. पण काळजी करू नका, आम्ही पुढच्या वर्षी बंगालमध्ये सरकार स्थापन करू आणि उर्वरित भागाला कुंपण घातले जाईल," असेही ते म्हणाले.जाते. ४५० किमीचे कुंपण घालण्याचे काम पूर्ण झाले नाही कारण बंगाल सरकार घुसघोरांवर दया दाखवत आहे," असे शाह म्हणाले."२,२०० किमी सीमा भागातील जमिनीपैकी फक्त ४५० किमी भागात कुंपण होणे बाकी आहे. पण पश्चिम बंगाल सरकार कुंपणाच्या कामासाठी जमीन देत नाहीये," असेही शहा यांनी सांगितले. केंद्र सरकारने पश्चिम बंगाल सरकारला ११ पत्रे लिहिली आहेत आणि राज्य अधिकाऱ्यांशी या विषयावर सात वेळा चर्चा केली आहे.

### इमिग्रेशन विधेयकात काय आहे?

इमिग्रेशन अँड फॉरेन्सर बिल, २०२५ नुसार जर कोणी बनावट पासपोर्ट किंवा व्हिसा घेऊन भारतात प्रवेश केला किंवा भारतात वास्तव्य केले किंवा देश सोडून जात असेल तर त्याला सात वर्षांपर्यंतचा कारावास आणि १० लाखांपर्यंत दंडाच्या शिक्षेची तरतूद यामध्ये करण्यात आली आहे.

---

# शीख स्थलांतरितांना पगडी काढायला लावली?

## भारतीयांना वाईट वागणूक दिल्याच्या आरोपांवर अमेरिकेचे स्पष्टीकरण



**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**अमेरिकेत अवैध प्रवेश करणाऱ्या स्थलांतरितांविरोधात गेल्या महिन्यात ट्रम्प प्रशासनाने कठोर कारवाई केली होती. अमेरिकन लष्कराच्या तीन विमानातून शेकडो भारतीयांना मायदेशी परत पाठवण्यात आले. या दरम्यान भारतीय नागरिकांना विमानात वाईट वागणूक दिल्याचा आरोप करण्यात आला होता.**

यानंतर भारत सरकारने याबद्दल औपचारिक स्वरूपात चिंता व्यक्त केली होती, यानंतर आता अमेरिकेने यावर प्रतिक्रिया दिली आहे.भारताने उपस्थित केलेल्या चिंता या विशेषतः धार्मिक संवेदनशीलता आणि प्रवाशांना देण्यात आलेले अन्न या संबंधित होत्या अशी माहिती परराष्ट्र राज्यमंत्री किर्ती वर्धन सिंह यांनी गुरूवारी राज्यसभेत दिली. केंद्र सरकारने सांगितले की, परत पाठवले जात असताना शीख निर्वासितांना त्यांची पगडी काढायला लावल्याचा, तसेच महिला व लहान मुलांना बेड्या घातल्याचा वृत्तांबाबत भारताने तीव्र आक्षेप घेतला.मंत्रालयाने अमेरिकन प्रशासनाकडे ५ फेब्रुवारी रोजी उतरलेल्या विमानातील निर्वासितांना देण्यात आलेल्या वागणुकीबाबत विशेषतः महिलांना बेड्या घालण्यात आल्याच्या मुद्द्यावर अत्यंत कठोर शब्दात चिंता व्यक्त केल्या. त्यावर अमेरिकेने माहिती दिली आहे की १५ आणि १६ फेब्रुवारी रोजी भारतात उतरलेल्या निर्वासितांना घेऊन आलेल्या विमानांमध्ये कोणत्याही महिला किंवा मुलांना बेड्या घालण्यात आल्या नव्हत्या," असे सभागृहात सांगण्यात आले.सिंह यांनी सांगितले की, अमेरिकन अधिकाऱ्यांनी नवी दिल्लीकडून व्यक्त करण्यात आलेल्या चिंतेला उत्तर दिले आहे. त्यांनी स्पष्ट केले की कोणत्याही निर्वासितांना डोक्यावरील धार्मिक वस्त्र काढण्यास सांगण्यात आले नाही आणि विमान प्रवासादरम्यान त्यांना फक्त शाकाहारी जेवण देण्यात आले. "त्यांच्या उत्तरात अमेरिकन अधिकाऱ्यांनी सांगितले की, ५, १५ आणि १६ फेब्रुवारी २०२५ रोजी आलेल्या तीन चार्टर्ड विमानांमधील निर्वासितांना डोके झाकण्याचे धार्मिक कापड (पगडी) काढण्याचे आदेश देण्यात आले नव्हते आणि निर्वासितांनी विमान प्रवासादरम्यान शाकाहारी जेवणाव्यतिरिक्त कोणत्याही धार्मिक जागेची विनंती केली नव्हती," असेही किर्ती वर्धन सिंह यांनी सांगितले.

### भारताने उपस्थित केल्या चिंता

डोनाल्ड ट्रम्प यांनी २० जानेवारी रोजी दुसऱ्यांदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी देशातील बेकायदेशीर निर्वासितांबद्दल कठोर भूमिका घेतली होती. अमेरिकेत बेकायदेशीर प्रवेश केलेल्या शेकडो भारतीयांना तीन वेगवेगळ्या लष्करी विमानातून पंजाबमधील अमृतसर विमानतळावर सोडण्यात आले.

# सानिकाने शेअर केला व्हिडीओ ?



‘नवरी मिळे हिटलरला’ ही लोकप्रिय मालिकांपैकी एक आहे. या मालिकेतील सर्वच पात्रे प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन करतात. जशी लीला व एजेची केमिस्ट्री पाहण्यास प्रेक्षक उत्सुक असतात. तसेच किशोर व दुर्गाचे लीला व एजेला त्रास देण्यासाठीच्या योजना याबरोबरच सरू हे विनोदी पात्र पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक असतात. एजे व लीलाला त्रास देण्यासाठी दुर्गा, लक्ष्मी व सरस्वती नेहमी काही ना काही करत असल्याचे दिसतात. नवरी मिळे हिटलरला मालिकेत दाखविल्याप्रमाणे, लीलाचा अपमान करण्यासाठी, तिला वाईट वाटावे म्हणून दुर्गा, लक्ष्मी व सरस्वती यांनी लीलाने काम केलेली जाहिरात सर्वांसमोर लावली. ज्यामध्ये ती अगदी कमी स्क्रीनवर दिसली. हे पाहिल्यानंतर या सुनांनी सर्वांसमोर तिचा अपमान केला, खिल्ली उडवली. त्यानंतर लीलाला वाईट वाटले. एजेने सुनांनी केलेली कृती ही अत्यंत चुकीची असल्याचे म्हणत त्यांना शिक्षा झाली पाहिजे असे सुनावले. तसेच ही शिक्षा लीलाने द्यावी, असेही त्याने स्पष्ट केले. लीलाने दुर्गा, लक्ष्मी व सरस्वती यांना टायगर या त्यांच्या श्वानाच्या मागे पळावं, अशी शिक्षा दिली होती. आता या सीनच्या शूटिंगदरम्यानचा एक व्हिडीओ अभिनेत्री सानिका काशिकरने सोशल मीडियावर शेअर केला आहे.नवरी मिळे हिटलरला मालिकेत लक्ष्मीची भूमिका साकारणारी अभिनेत्री सानिका काशिकरने तिच्या इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये लीला व तिच्या तिन्ही सूना दिसत आहेत. लीलाने शिट्टी वाजवल्यानंतर या तिन्ही सुना वार्म अप करताना दिसत आहेत. हे वार्म अप करताना दुर्गा लक्ष्मी व सरस्वती मजा करीत असल्याचे त्यांच्या कृतीमधून दिसत आहे. या व्हिडीओवर ‘लीलाच्या तालावर सुना नाचताना’ असे लिहिले आहे. सानिकाने हा व्हिडीओ शेअर करताना शर्मिला शिंदे, वल्लरी विराज व भूमिजा पाटील यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटलादेखील टॅग केले आहे.

# सैफवरील हल्ल्यानंतर सारा अली खानने दिली प्रतिक्रिया



सुप्रसिद्ध बॉलिवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर काही दिवसांपूर्वी प्राणघातक हल्ला झाला होता. चोरीच्या उद्देशाने शिरलेल्या एका चोराने त्याच्यावर चाकूने वार केला. हा वार इतका खोलवर होता की त्याच्या शरीरात चाकूचा तुकडा अडकून राहिला. दरम्यान, शस्त्रक्रिया करून हा तुकडा काढण्यात आला. याप्रकरणी त्याची मुलगी सारा अली खानने पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे. वडिलांवर झालेल्या हल्ल्यामुळे तिच्यावर प्रचंड आघात झाल्याचं ती म्हणाली. टाइम्स नाऊ समिट २०२५ मध्ये ती बोलत होती. सारा अली खान म्हणाली, “मला त्या क्षणाविषयी फारसं काही आठवत नाही. मी एकदम थंड पडले होते. इब्राहिम (अली खान, धाकटा भाऊ) आणि मी थेट हॉस्पिटलमध्ये पोहोचलो. आम्ही रुग्णालयात पोहोचताच आम्हाला कळलं की त्यांना फार गंभीर दुखापत झालेली नाही. हे केवळ १५ ते २० मिनिटांत घडलं. पण हे १५ ते २० मिनिटे आम्हाला एका आयुष्यासारखे वाटले.”शस्त्रक्रियेनंतर काही दिवसांनी सैफला डिस्चार्ज देण्यात आला. डिस्चार्ज मिळाल्याने तो अत्यंत आत्मविश्वासाने चालताना दिसला. तैमुर आणि जेहला बरं वाटावं म्हणून तो आत्मविश्वासाने चालत होता का असं विचारलं असता सारा म्हणाली, “तो चार मुलांचा बाप आहे; त्यापैकी दोन खूप तरुण आणि प्रभावशाली होते. प्रत्येक पालक असं करतात.

# आयोजक माझे पैसे घेऊन पळून गेले



अनेक बॉलीवूड आणि पंजाबी गाण्यांना आपल्या आवाजाने स्वरबद्ध करणारी लोकप्रिय गायिका म्हणजे नेहा कक्कर. आजवर आपल्या सुमधूर आवाजाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. चित्रपट व अल्बम्समध्ये गाणं गाण्याशिवाय गायिका अनेक ठिकाणी गाण्याचे लाईव्ह शोजही करत असते आणि तिच्या या लाईव्ह शोला रसिकांकडूनही तुफान प्रतिसाद मिळताना दिसतो. आपल्या गाण्यांनी चर्चेत राहणारी ही गायिका दोन दिवसांपूर्वी तिच्या गाण्याच्या कार्यक्रमात उशिरा पोहोचली आणि यामुळे तिला स्टेजवरच रडू कोसळलं होतं. खरंतर ऑस्ट्रेलियातील मेलबर्नमध्ये नेहा कक्करच्या गाण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, मात्र ती स्वतःच्या शोसाठी तब्बल तीन तास उशीरा पोहोचली. यामुळे तिची वाट पाहून वैतागलेले प्रेक्षक प्रचंड भडकले होतेयानंतर नेहा स्टेजवर आली तेव्हा सगळ्यांनी तिला परत जाण्यास सांगितलं. यामुळे तिला सोशल मीडियावर प्रचंड ट्रोलिंगला सामोरे जावे लागले. नेहाने तिच्या चुकीबद्दल चाहत्यांची माफीही मागितली मात्र तरीही लोकांचा विरोध काही थांबला नाही आणि लोकांच्या निषेधानंतर ती स्टेजवरच रडू लागली. अशातच तिने याप्रकरणी भाष्य केलं आहे. याबद्दल नेहाने पोस्ट शेअर केली आहे.या पोस्टमध्ये तिने असं म्हटलं आहे की, “त्यांनी सांगितले की मी ३ तास उशिरा आली. पण त्यांनी एकदाही विचारले का माझे काय झाले? त्यांनी माझे आणि माझ्या बँडसाठी काय केले? जेव्हा मी स्टेजवर बोलली तेव्हा मी कोणालाही आमच्याबरोबर काय झाले ते सांगितले नाही. कारण मला कोणालाही दुखवावे असे वाटत नव्हतं. पण आता हे प्रकरण माझ्या नावावर आले आहे, त्यामुळे मला याबद्दल बोलायचे होते आणि ते इथे आहे.”यानंतर ती असं म्हणाली आहे की, “तुम्हाला माहिती आहे का? की मी माझ्या मेलबर्नमध्ये प्रेक्षकांसाठी अगदी मोफत सादरीकरण केले. आयोजक माझे आणि इतरांचे पैसे घेऊन पळून गेले. माझ्या बँडला जेवण, हॉटेल आणि पाणीही दिले गेले नाही. माझे पतीने त्यांच्यासाठी जेवणाची सोय केली. तुम्हाला माहिती आहे का आमच्या कार्यक्रमाआधी आवाज तपासणीला काही तास उशीर झाला, कारण त्यासाठी पैसे दिले गेले नव्हते आणि त्याने ध्वनी तपासणी करण्यास नकार दिलातेव्हा मी कार्यक्रमस्थळी पोहोचू शकले नाही, ध्वनी तपासणी करू शकले नाही, आम्हाला हेदेखील माहित नव्हते की कॉन्सर्ट सुरू आहे की नाही, कारण आयोजकांनी माझ्या व्यवस्थापकाचे फोन उचलणे बंद केले होते. शेअर करण्यासाठी अजून बरेच काही आहे.

# सई पहिल्यांदाच थिरकणार लावणीवर!

२०२५ वर्ष सुरू झाल्यापासून अनेक नव्या मराठी सिनेमांची घोषणा झाली आहे. तर काही सिनेमांच्या प्रदर्शनाच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. यात दिवसागणिक वाढ होत असून आता ‘देवमाणूस’ या नव्या मराठी सिनेमाची घोषणा झाली आहे. हा मल्टीस्टारर सिनेमा असून यात महेश मांजरेकर, सुबोध भावे, रेणुका शहाणे आणि सिद्धार्थ बोडके हे कलाकार झळकणार आहेत. ‘देवमाणूस’ चित्रपटाचं दिग्दर्शन तेजस देऊस्कर यांनी केलं आहे. या चित्रपटाची निर्मिती बॉलीवूडमधील प्रसिद्ध दिग्दर्शक लव रंजन यांच्या निर्मितीसंस्थेने केली आहे. लव रंजन आणि अंकुर गर्ग यांची लव फिल्म्स कंपनी अनेक लोकप्रिय बॉलीवूड चित्रपटांसाठी ओळखली जाते, त्यांनी ‘तू झूठी मैं मक्कार’, ‘सोनू के टिटू की स्वीटी’, ‘दे दे प्यार दे’ यांसारख्या चित्रपटांची निर्मिती केली आहे. आता ही कंपनी मराठी सिनेमात प्रवेश करत आहे. ‘देवमाणूस’ हा त्यांची निर्मिती असलेला पहिला मराठी सिनेमा असून, तो २५ एप्रिल २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.या सिनेमाबाबत नुकतीच महत्वपूर्ण गोष्ट समोर आली आहे, ती म्हणजे मराठीसह हिंदी चित्रपटांमध्येही आपल्या उत्तम अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात स्वतःचे स्थान निर्माण करणारी सर्वांची लाडकी अभिनेत्री सई ताम्हणकर ‘देवमाणूस’मध्ये पहिल्यांदाच लावणी सादर करणार आहे.हे गाणं एप्रिलमध्ये चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, सई ताम्हणकरच्या चाहत्यांसाठी तसेच मराठी प्रेक्षकांसाठी ही एक विशेष भेट असणार आहे.

# रहाणेची विनंती क्युरेटरने नाकारली!

## मी इथे असेपर्यंत" खेळपट्टी बदलणार नाही : सुजन मुखर्जी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**यंदाच्या आयपीएलमध्ये कोलकाता नाईट रायडर्सने गुवाहटीत झालेल्या सामन्यात राजस्थानला पराभूत करत आपले विजयाचे खाते उघडले आहे. तत्पूर्वी पहिल्या सामन्यात कोलकात्याला घरच्या ईडन गार्डन्स मैदानावर रॉयल चॅलेंजर्सकडून पराभव स्वीकारावा लागला होता. यामध्ये मजेशीर गोष्ट अशी की, कोलकात्याला त्यांचे होम ग्राउंड असलेल्या ईडन गार्डन्सवर फिरकीपटूंसाठी अनुकूल असलेल्या खेळपट्टी तयार करण्यास क्युरेटरने नकार दिला होता.**



पण परंतु गुवाहटीत कोलकात्याच्या फिरकीपटूंना अनुकूल परिस्थिती मिळताच त्यांनी त्याचा फायदा उठवला.क्विंटन डी कॉकच्या नाबाद ९७ धावांमुळे कोलकात्याने राजस्थानवर आठ विकेट्सने विजय मिळवला. पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, त्यांचे फिरकीपटू मोईन अली आणि वरुण चक्रवर्ती यांनी केलेल्या कामगिरीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सच्या फलंदाजांना त्यांनी फक्त १५१ धावांवर रोखले. बंगळुरू विरुद्धच्या पहिल्या सामन्यादरम्यान, ईडन गार्डन्सचे पिच क्युरेटर सुजन मुखर्जी यांनी केकेआरचा कर्णधार अजिंक्य रहाणेने फिरकी गोलंदाजांसाठी अनुकूल असलेली खेळपट्टी बनवण्याची विनंती केली होती.

पण रहाणेची ही विनंती नाकारल्याचे वृत्त समोर आले होते. असे इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तात म्हटले आहे.यावेळी रहाणेच्या विनंतीला उत्तर देताना क्युरेटर सुजन मुखर्जी यांनी, "मी इथे असेपर्यंत" खेळपट्टी बदलणार नाही", असे म्हटले होते.दरम्यान या प्रकरणाची माहिती समोर येताच न्यूझीलंडचे माजी क्रिकेटपटू आणि समालोचक सायमन डोल यांनी, कोलकाता नाइट रायडर्सने "फ्रँचायझी दुसरीकडे हलवण्याचा" विचार करावा, असे म्हटले आहे.ते म्हणाले, "जर क्युरेटर घरच्या संघाला काय हवे आहे याकडे लक्ष देत नसेल तर काय उपयोग.

ते स्टेडियमचे शुल्क भरत असतील, आयपीएलमध्ये काय चालले आहे याकडे लक्ष देत असतील पण तरीही क्युरेटर अजूनही घरच्या संघाला काय हवे आहे याची काळजी घेत नसेल, तर कोलकाता नाइट रायडर्सने फ्रँचायझी दुसरीकडे हलवावी. खेळावर मत मांडणे त्यांचे काम नाही. त्यासाठी त्यांना पैसे दिले जात नाहीत," असे डोल यांनी क्रिकबझवर बोलताना म्हटले. जर ते घरच्या मैदानावर खेळत असतील तर त्यांना त्यांच्या गोलंदाजांसाठी योग्य वाटणारी खेळपट्टी मिळायला हवी.

### मी खूप नाराज झालो असतो

कोलकाता नाइट रायडर्सच्या क्युरेटरनी जे म्हटले आहे ते मी पाहिले. जर मी केकेआर कॅम्पमध्ये असतो, तर त्यांनी जे म्हटले त्यावर मी खूप नाराज झालो असतो. पण मला वाटते की आयपीएलसारख्या स्पर्धेत घरच्या मैदानावर फायदा मिळवण्यात काहीही गैर नाही", अशा शब्दांत हर्षा भोगले यांनीही या प्रकरणावर नाराजी व्यक्त केली आहे.आयपीएल २०२५ च्या सहाव्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सचा संघ राजस्थान रॉयल्सच्या घरच्या मैदानावर खेळण्यासाठी उतरला होता. या सामन्यात यष्टीरक्षक फलंदाज क्विंटन डिकॉकने नाबाद ९७ धावांची खेळी करत हा ट्रेंड कायम ठेवला. २६ मार्चला गुवाहाटी येथे झालेल्या सामन्यात त्याने राजस्थानविरुद्ध ६१ चेंडूत ८ चौकार आणि ६ षटकारांसह ९७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी खेळली आणि आपल्या संघाला विजय मिळवून देऊन नाबाद परतला.

# अनसोल्ड राहिलेल्या शार्दुलचा कहर!

## बदली खेळाडू म्हणून आला अन् ठरला नंबर वन गोलंदाज

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लॉर्ड शार्दुल ठाकूर... आयपीएल २०२५ मध्ये ज्या खेळाडूला लिलावात कोणी बोली लावली नाही, त्याच शार्दुलने आयपीएल २०२५ मध्ये बदली खेळाडू म्हणून येत नंबर वन गोलंदाज ठरला आहे. शार्दुल ठाकूरने सनरायझर्स हैदराबादविरुद्ध सामन्यात भेदक गोलंदाजी करत फलंदाजांच्या धावांवर चांगलाच ब्रेक लावला. आयपीएल २०२५ च्या सुरूवातीलाच पर्पल कॅप नावे करणाऱ्या ४ षटकांत ३४ धावा देत ४ विकेट घेतले.**




शार्दुल ठाकूरने आतापर्यंत खेळलेल्या सामन्यांमध्ये सर्वाधिक विकेट घेतल्या आहेत. त्याने २ सामन्यात ६ विकेट घेतल्या आहेत. शार्दुल ठाकूरने आयपीएल 2025 मध्ये आज वर्चस्व गाजवले असले तरी याआधी त्याला कोणत्याही संघोन लिलावात बोली लावली नव्हती आणि तो अनसोल्ड गेला होता. तो मेगा लिलावात २ कोटींच्या मूळ किमतीसह उतरला होता.आयपीएल २०२४ मध्ये चेन्नई सुपर किंग्जकडून ४ कोटी रुपयांसह संघाता भाग होता, पण चेन्नईने त्याला आयपीएल २०२५च्या लिलावापूर्वी रिलीज केले होते.

लिलावात चेन्नईनेही त्याचा संघात समावेश केला नाही. यानंतर लखनौ सुपर जायंट्सने त्यांचा मुख्य वेगवान गोलंदाज मोहसीन खान दुखापतीमुळे संघाबाहेर असल्याने त्याचा बदली खेळाडू म्हणून समावेश केला, पण आता तोच शार्दुल ठाकूर त्यांचा महत्त्वाचा गोलंदाज ठरला आहे.शार्दुलला लखनौच्या संघाने संधी देताच त्याने आपल्या कौशल्याच्या जोरावर कामगिरी करत त्याला लॉर्ड ठाकूर का म्हणतात हे सिद्ध केलं. या मोसमातील पहिल्या सामन्यात त्याने दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध पहिल्याच षटकात २ विकेट घेत पुनरागमनाचे संकेत दिले. यानंतर त्याने हैदराबादविरुद्ध सामन्यात पॉवरप्लेमध्ये अभिषेक शर्मा आणि इशान किशनसारख्या फलंदाजांना बाद करत आपल्या कामगिरीची पुन्हा छाप पाडली.

शार्दुलने त्याच्या स्पेलमधील दुसऱ्याच षटकात दोन चेंडूत दोन विकेट घेत हैदराबादच्या फलंदाजीला आळा घातला.तर डावातील अखेरच्या षटकांमध्ये त्याने शमी आणि अभिनव मनोहरची विकेट घेत ४ विकेट्स पूर्ण केले. अशारितीने त्याने ४ षटकांत ३४ धावा देत ४ विकेट घेतले.

### 4 षटकांत 34 धावा देत 4 विकेट

यासह शार्दुल ठाकूरने त्याचे आयपीएलच्या कारकिर्दीतील १०० विकेट्सही पूर्ण केले आणि यंदाची पर्पल कॅपही त्याच्याकडे आहे. शार्दुल ठाकूरने आतापर्यंत खेळलेल्या सामन्यांमध्ये सर्वाधिक विकेट घेतल्या आहेत. त्याने २ सामन्यात ६ विकेट घेतल्या आहेत. शार्दुल ठाकूरने आयपीएल 2025 मध्ये आज वर्चस्व गाजवले असले तरी याआधी त्याला कोणत्याही संघोन लिलावात बोली लावली नव्हती आणि तो अनसोल्ड गेला होता. तो मेगा लिलावात २ कोटींच्या मूळ किमतीसह उतरला होता.आयपीएल २०२४ मध्ये चेन्नई सुपर किंग्जकडून ४ कोटी रुपयांसह संघाता भाग होता, पण चेन्नईने त्याला आयपीएल २०२५च्या लिलावापूर्वी रिलीज केले होते. लिलावात चेन्नईनेही त्याचा संघात समावेश केला नाही. यानंतर लखनौ सुपर जायंट्सने त्यांचा मुख्य वेगवान गोलंदाज मोहसीन खान दुखापतीमुळे संघाबाहेर असल्याने त्याचा बदली खेळाडू म्हणून समावेश केला, पण आता तोच शार्दुल ठाकूर त्यांचा महत्त्वाचा गोलंदाज ठरला आहे. शार्दुलला लखनौच्या संघाने संधी देताच त्याने आपल्या कौशल्याच्या जोरावर कामगिरी करत त्याला लॉर्ड ठाकूर का म्हणतात हे सिद्ध केलं. या मोसमातील पहिल्या सामन्यात त्याने दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध पहिल्याच षटकात २ विकेट घेत पुनरागमनाचे संकेत दिले.

# महाईन्यूज

ePaper

। शुक्रवार ।

। दि. 28 मार्च 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती






Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
7
STAR
RANKING
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Website : www.http://mastermindglobalschool.com

# मोरया शिक्षण संस्था

## Computer Vacation Batch

**ADMISSIONS OPEN**

**2025-26**



| | | | |
|---|---|---|---|
| 'C' भाषा ₹ १३००/- | 'C++' भाषा ₹ १३००/- | बेसिक जावा ₹ १३००/- | स्क्रॅच ॲनिमेशन ₹ १३००/- |
| बेसिक टॅली ₹ १५००/- | एम.एस. ऑफिस ₹ १५००/- | कोरल ड्रॉ ₹ ११००/- | Adobe AB फोटोशॉप ₹ ११००/- |

सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.

**ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100**